**:: <u>प्रेस नोट</u> ::** दिनांक :- ११/०७/२०२६

**<u>वरिष्ठ पोलीस अधिकारी म्हणून बनाव करत असलेल्या तोतया अधिकारी व टोळीस गुन्हे शाखेकडून अटक केलेबाबत.</u>**

दिनांक २६/०६/२०२६ रोजी कक्ष-१, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई येथे प्राप्त तक्रारीवरून इसम नामे मोहम्मद गौस इब्राहिम खतीब उर्फ डॉ. राज खातीब, वय ५२ वर्षे हा वरिष्ठ पोलीस अधिकारी असल्याचा बनाव करून बनावट शासकीय ओळखपत्रे व पोलीस लिहलेली पाटी असलेल्या मोटार कारचा वापर करून त्याच्या इतर साथीदारांसह बॅंकेतून कर्ज मंजूर करून देण्याच्या बहाण्याने नागरिकांकडून पैसे घेऊन त्यांच्या फसवणूक करीत होता. त्यावरुन त्याच्याविरूध्द गु.प्र.शा.,गु.अ. वि.,गु.र.क्र.७२/२०२६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन त्यामध्ये ०३ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. **सदर गुन्हयाचा पुढील तपास कक्ष-१ मार्फत करण्यात येत आहे.** नमुद आरोपीतांनी त्यांच्या इतर साथीदारासह आणखी काही नागरीकांची फसवणुक केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

त्याप्रमाणे **तक्रारदार क्र. २ वय ३५ वर्षे यांना** नमुद गुन्हयातील अटक आरोपी १) मोहम्मद गौस इब्राहिम खतीब उर्फ डॉ. राज खातीब, वय ५२ वर्षे, २) राजेश बडे सिंह चौधरी, वय ४६ वर्षे, यांनी ते शासकीय विभागास कार्यरत असल्याचे भासवून तसेच त्यांचे इतर साथीदार पाहिजे आरोपी ३) अंदाजे वय ३५ वर्षे आणि पाहिजे आरोपी ४) अंदाजे वय ३५ वर्षे व गुन्हयात निष्पन्न होणारे इतर आरोपी त्यांनी तक्रारदार यांचा विश्वास संपादन करून, फौजदारी पात्र कट रचुन फिर्यादीचे बिल्डरकडे अडकलेले पैसे व्याजासह परत मिळवून देण्याचे किंवा संबधित प्रकल्पामध्ये प्लॅट मिळवून देण्याचे खोटे आश्वासन देवून त्यांचेकडून वेळोवेळी रोख रक्कम तसेच विविध बॅंक खात्यामध्ये पैसे स्विकारून तसेच ॲप्पल कंपनीचा फोन स्विकारून एकुण १५,९०,५३२/- रू.ची फसवणूक केली म्हणून **तक्रारदार हे गुन्हे शाखा, मुंबई येथे हजर झाले व त्यांनी दिलेल्या तक्रारी वरून नमुद आरोपीविरूध्द गु.प्र.शा.,गु.र.क्र.७६/२०२६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्हयातील आरोपी राजेश बडे सिंह चौधरी, वय ४६ वर्षे यास जयपूर राजस्थान येथून ताब्यात घेवून गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास कक्ष-१ मार्फत करण्यात येत आहे.**

तसेच **तक्रारदार क्र. ३ वय-४० वर्षे,** यांनी सोशल मीडीयावर पहिल्या गुन्हयांची बातमी पाहिल्यानंतर ते गुन्हे शाखा कार्यालय, मुंबई येथे हजर झाले असता, त्यांनी माहिती दिली की, आरोपी नामे १) महंमदगौस इब्राहिम खातीब उर्फ राज खातीब, वय अंदाजे ५४ वर्षे २) मसहब महंमदगौस खतिब, वय ३० वर्षे व ३) पाहिजे आरोपी अंदाजे वय ३५ वर्षे यांनी कट रचून, आरोपी राज खातीब हा पोलीस खात्यात वरिष्ठ अधिकारी असल्याचा बनाव करुन, तक्रारदार क्रमांक ३ यांचे ओळखीच्या तीन तरुणांची पोलीस दलात भरती करुन देतो, असे सांगून त्यांचेकडून रु. १२,००,०००/- घेवुन, त्यांची फसवणुक केली आहे. त्यांचे तक्रारीवरुन **गु.प्र.शा.गु.र.क्र. ७८/२६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास कक्ष-३ मार्फत करण्यात येत आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. कृष्ण कान्त उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. राज तिलक रौशन, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, डी-दक्षिण, श्री. दिनकर शिलवटे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, डी-मध्य, श्री. सदानंद राणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-१ येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. अरविंद पाटील, प्रभारी पोलीस निरीक्षक गणेश पिसाळ, (कक्ष-३) सपोनि सिध्देश जोष्टे (कक्ष-३), देवीदास लाब्दे (कक्ष-१), महेश सांगळे (कक्ष-१), सचिन बाराते (कक्ष-५), पोउनि खैरावकर (कक्ष-३), सफौ. प्रकाश माने,(कक्ष-१), पो.ह. गिरकर (कक्ष-३), पो.शि. घाडी (कक्ष-१), केळकर (कक्ष-१), जाधव (कक्ष-१) यांनी केली आहे.

---